# श्रीनाथ कृपा नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित, परिंचे

**मुख्य कार्यालय : सोपाननगर रोड, सासवड, ता.पुरंदर, जि.पुणे**

नोंदणी क्र.: पी.एन.ए./पी.एन.आर./आर.एस.आर./(सी.आर.)/३७९/९२-९३

## २७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांसाठी)

सन्माननीय सभासद बंधू-भगिनींनो,

संस्थेच्या सन्माननीय सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा **शनिवार, दि. २०/०३/२०२१ रोजी सकाळी ठीक ९.०० वा. व्हिडीओ कॉन्फरन्सिंग द्वारे** खालील विषयावर विचार विनिमय करण्याकरीता आयोजित करण्यात आली आहे. तरी आपण सर्वांनी सभेत सहभाग घ्यावा ही विनंती.

## * सभेपुढील विषय *

१) मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.
२) दि.३१/०३/२०२० अखेर संपलेल्या आर्थिक वर्षाचा संचालक मंडळाने सादर केलेला अहवाल, नफा-तोटा व ताळेबंद पत्रक यांना मंजूरी देणे.
३) सन २०१९-२० या अहवाल सालातील नफा विभागणीस मंजूरी देणे.
४) सन २०१९-२० मधील अंदाजपत्रकापेक्षा अधिक झालेल्या खर्चास मंजूरी देणे.
५) सन २०१९-२० या आर्थिक वर्षाच्या शासकीय लेखापरिक्षण अहवालाची नोंद घेणे.
६) संचालक मंडळ सदस्य व त्यांचे नातेवाईक यांना दिलेल्या कर्जाची माहिती व नोंद घेणे.
७) सन २०१८-१९ या आर्थिक वर्षाच्या लेखापरीक्षणांचा दोषदुरुस्ती अहवाल व त्यावरील निबंधकाच्या निर्देशांची नोंद घेऊन कार्यवाही करणे.
८) सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकास मंजूरी देणे.
९) सन २०२०-२१ या आर्थिक वर्षासाठी कायदा/नियम यामधील तरतूदी नुसार बाहेरील कर्ज मर्यादा व जबाबदारी निश्चित करणे.
१०) सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाकरीता संचालक मंडळाने नेमणूक केलेल्या शासकीय लेखापरीक्षकांच्या नेमणूकीस मंजूरी देणे.
११) २६ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेस अनुपस्थित असणाऱ्या सभासदांची अनुपस्थिती क्षमापित करणे.
१२) मा.अध्यक्षांच्या परवानगीने येणाऱ्या इतर विषयांवर चर्चा करणे.

स्थळ : सासवड
दिनांक : १३/०३/२०२१

संचालक मंडळाचे वतीने
**श्री.यादव डी.एम**
(सरव्यवस्थापक)

---

**विशेष सूचना :**

१) ज्या सभासदांना प्रश्न विचारावयाचे असतील अगर सूचना करावयाच्या असतील त्यांनी वार्षिक सभेपूर्वी २ दिवस अगोदर संस्थेच्या कार्यालयात लेखी स्वरूपात कळविणे आवश्यक आहे.
३) ज्या सभासदांच्या राहण्याच्या व कामाच्या पत्त्यात बदल झाला असेल त्या सभासदांनी कार्यालयात लेखी कळवावे.
४) आपले भागदाखले ज्या सभासदांनी आजपर्यंत कार्यालयातून नेले नसतील त्यांनी ते त्वरीत घेऊन जावेत.
५) सभासदांनी आपले भ्रमणध्वनी क्रमांक व ईमेल आयडी आपल्या नजीकच्या शाखेत सभा दिनांकापूर्वी किमान दोन दिवस अगोदर नोंदणी करून घ्यावेत.